MC 11/1/2021

<u>व्यवस्थापन परिषदेची दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.</u>

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही | संबंधित विभाग |
|---|---|---|
| बाब १. | **दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (आयडॉल) अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेबाबत गठीत करण्यात आलेल्या तांत्रिक समितीचा अहवाल.** | परिक्षा व मुल्यमापन मंडळ |
| ठराव | माननीय कुलगुरू यांनी सांगितले की, मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या ऑनलाइन अंतिम वर्षाच्या परीक्षेत काही तांत्रिक अडचणी आल्यामुळे परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. ऑनलाईन परीक्षा प्रणालीच्या मुल्यांकनासाठी तांत्रिकदृष्टया स्थिर, सुरक्षित व प्रमानजोगी व्यासपीठ शोधण्याकरिता व परीक्षेत व्यत्यय न येता सुरळीतपणे कश्या घेता येईल याची तपासणी करण्याकरिता श्री. राजेंद्र देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठीत करण्यात आली. मा. कुलगुरू यांनी प्र-कुलगुरू यांना सदर समितीचा अहवाल पटलावर ठेवण्यास सांगितले. प्र-कुलगुरू यांनी श्री. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या पटलावर ठेवला व अहवालाबाबत सविस्तर विवेचन केले; सदर अहवाल हा प्रथम माहिती व तंत्रज्ञान मंडळापुढे ठेवण्यात आला व माहिती व तंत्रज्ञान मंडळाच्या शिफारशी या व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात आल्या तसेच शासन निर्णय क. भांखस-२०१४/प्र.क. ८२/भाग-III/उदयोग-४ दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका मधील परिच्छेद ३.३.१ नुसार तातडीच्या स्वरूपातील खरेदी करण्याबाबतच्या तरतुदीकडे सदस्यांचे लक्ष वेधले. सदर चर्चेत सर्व सदस्यांनी सक्रीय सहभाग घेतला व आपापली मते मांडली. सविस्तर चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला:-<br><br>१. याबाबत प्रथम गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावा जेणेकरून नेमक्या कुठे उणिवा झाल्या हे लक्षात येईल.<br>२. यापुढील परीक्षा कशा घेता येईल यासाठी खालीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली:-<br>१. ॲड निल हेळेकर<br>२. डॉ. कविता लघाटे<br>३. श्री. किशोर पाटील<br>सदर समितीने दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षा घेण्याकरता दोन सेवा प्रदाता नेमावे का? तसेच याबाबत सेवा प्रदाता नेमण्याची | |

| | | |
|---|---|---|
| | कार्यप्रणाली बाबत विचार करण्यात यावा. परीक्षेबाबत काही तांत्रिक अडचण परत निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांकरिता पर्यायी व्यवस्था तयार करण्यात यावी ज्या विद्यार्थ्यांना जवळच्या परीक्षा केंद्रात जावून परीक्षा देता येईल. सदर समितीने तातडीने त्यांचा अहवाल सादर करावा. सदर अहवालानुसार अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.<br><br>३. प्रा. बी. एन. जगताप, श्री. दीपककुमार मुकादम व प्रा. वैभव नरवडे यांचे तसेच काही शिक्षकांचे परीक्षा सुरळीत पार पाडण्याकरिता सहकार्य घेण्यात यावे.<br><br>४. परीक्षेसंदर्भात काही तातडीची अडचण निर्माण झाल्यास त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार माननीय कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| **परिक्षा व मुल्यमापन मंडळ हया विभागाने केलेली कार्यवाही** | ठरावानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. | |

मुंबई – ४०० ०३२
जानेवारी, २०२१

प्र. कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)